| CNR No. MHRG080002042023 | **नियमित दिवाणी मुकादमा क्र. ११/२०२३**<br>मे.रामा स्टील टयुब लि.<br>**विरूध्द**<br>महेश लक्ष्मण पवार |
|---|---|

**निशाणी क्र. २८ वरील आदेश.**

१. सदरचा अर्ज अर्जदारयांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये त्यांना दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून सामिल करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे. वादी यांनी अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल केले आहे व योग्य ते आदेश पारित व्हावेत अशी विनंती केलेली आहे.

२. अर्जदार यांच्या प्रस्तुतच्या अर्जातील कथन असे आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा मनाई हुकूमाकरीता न्यायालयात दाखल केलेला आहे. दावा मिळकत सदर्भात अर्जदार यांनी वादी यांच्या विरुध्द खालापूर येथील दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्थर यांचे न्यायालयात रे.मु. क्र.११२/२०१५ अन्वये दावा दाखल केलेला होता. सदररील दाव्याच्याकामी वादी व अर्जदार यांच्यामध्ये तडजो झाली होती. सदरील तडजोडी नूसार प्रस्तुतचा दावा दिनांक १२/११/२०१६ रोजी लोक न्यायालयात निकाली काढून त्याप्रमाणे न्यायालयाने हुकूमनामा पारित केलेला आहे. सदरील तडजोडी नूसार किंबहुना लोकन्यायालयातील अटी व शर्ती नूसार अर्जदार यांनी वादी यांचा उपरोक्त दावा मिळकतीवरील प्रत्यक्ष ताबा मान्य व कबूल केलेला आहे. तसेच उपरोक्त दावा मिळकतीचे वादी यांना कायम स्वरुपी मान्य व कबूल करुन उपरोक्त दावा मिळकतीची महाराष्ट्र शासनाकडून विक्री परवानगी आणून दावा मिळकतीचे खरेदीखत वादी यांच्या

लाभात लिहून देण्याचे अर्जदार यांनी मान्य व कबूल केलेले होते. वरीलप्रमाणे परिस्थिती असतांना प्रतिवादी यांनी अर्जदार यांची फसवणूक करुन त्यांच्याकडून दिनांक २९/०९/२०२२ रोजी विना मोबदला खरेदीखत लिहून घेतलेले आहे. एकंदरीत प्रतिवादी यांनी अर्जदार यांच्या अशिक्षीत पणाचा गैर फायदा घेवून त्यांची घोर फसवणूक केलेली आहे. त्यामुळे प्रस्तूत अर्जदार यांना दाव्यामध्ये पक्षकार करुन त्यांचे म्हणणे फैलावर येणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्यात यावा.

३. अर्ज वाचला, वादीचे वकीलांचा व अर्जदारतर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द निरंतर मनाई हुकूमाकरिता दाखल केलेला आहे. मौजे उंबरे ता. खालापूर येथील सर्वे नं.१५१ चा हिस्सा नं.१अ/१, १क, १फ, १ब, सर्वे नं.१५२ चा हिस्सा नं.१, २अ व सर्वे नं.१५५ चा हिस्सा नं.४ब या मिळकती वादीच्या मालकीच्या व ताबे कब्ज्यात आहेत. या मिळकतीमध्ये वादी कंपनीचा इलेक्ट्रीक रेसिस्टंट वेल्डेड पाईप उत्पादन करण्याचा कारखाना आहे व वादी कंपनीच्या तीन शेड असून तेथे पाईप उत्पादन करण्याचा व विकण्याचा व्यवसाय चालतो. वादींची कंपनी सन २०१५ पासून सुरू असून कंपनीमध्ये ७५ कामगार आहेत. सदर मिळकतीस लागून सर्वे नं.१५४ चा हिस्सा नं.०, सर्वे नं.१६३ चा हिस्सा नं.१अ व सर्वे नं.१६४ चा हिस्सा १अ अशा मिळकती भुऱ्या कातकरी, सिताराम कातकरी, लक्ष्मी वाघमारे यांच्या मालकीच्या असून त्या खोपोली पाली रस्त्याला लागून आहेत. या मिळकती वादी यांच्या प्रत्यक्ष ताबे कब्ज्यात सन २०१४ पासून आहेत. वादी कंपनी सदर मिळकतीचा विना हरकत सतत उघडपणे आणि शांततामय उपभोग मालकी हक्काने घेत आहे. असे असतांना सदर

मिळकतीचे खरेदीखत प्रतिवादी याने दिनांक २९/०९/२०२२ रोजी भुऱ्या कातकरी वगैरे यांच्याकडून करुन घेतली असल्याची माहिती वादीला मिळाली. ते खरेदीखत वादीवर बंधनकार नाही. प्रतिवादी हा सदर खरेदी खताच्या आधारावर वादीच्या दावा मिळकतीवरील कब्ज्यास हरकत करण्याचा व अडथळा आणण्याचा संभव आहे. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर मनाई हुकूमाक करिता दाखल केलेला आहे. सदर दाव्यात प्रतिवादी हजर झालेले असून त्यांनी निशाणी क्र.१९ नूसार वादीच्या दाव्यास म्हणणे दाखल केलेले आहे. वादीने निशाणी क्र.४ वरील कागद यादी सोबत रे.मु.क्र.११२/२०१५ मधील निशाणी क्र.१ व तडजोड पुरशीसची झेरॉक्स प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सदर निशाणी क्र.१ चे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, रे.मू.नं.११२/२०१५ हा दावा भुऱ्या कातकरी, सिताराम कातकरी व लक्ष्मी वाघमारे यांनी रामा स्टील टयुब लि. यांच्याविरुध्द निरंतर ताकिद मनाई हुकूमाकरिता तसेच अतिक्रमण दूर होवून मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सर्वे नं.१६४ हिस्सा नं.१अ, सर्वे नं.१६३ हिस्सा १अ व सर्वे नं.१५४ या दावा मिळकती आहेत. सदरचा दावा हा दिनांक १२/११/२०१६ रोजी महा लोक अदालतमध्ये निकाली करण्यात आलेला आहे. निशाणी क्र.२२ वरील पुरशिस नुसार सदरचा दावा निकाली निघाला असून सदर पुरशिस नुसार भुऱ्या कातकरी वगैरे यांनी वादीचा म्हणजेच रामा स्टील टयुब लि. यांचा ताबा मान्य केलेला आहे. त्यामुळे वादीचे दाव्याचे स्वरुप, दाव्यातील मागणी हे सर्व लक्षात घेता प्रस्तुतच्या अर्जातील मागणी ही न्यायोचित दिसून येत आहे. सदरच्या मागणीमुळे दोन्ही पक्षातील वादाचे कायमचे निराकरण होण्यास नक्कीच मदत होणार आहे. प्रस्तावित अर्जदार यांना दाव्या मध्ये प्रतिवादी म्हणून सामिल करुन घेतल्यास दाव्याच्या मुळ स्वरुपात देखील कोणताही बदल होत नाही. सदरची दुरूस्ती झाल्यास प्रतीवादीवरही कोणताही अन्याय

होणार नाही. प्रतीवादी यांना त्यांची दुरुस्त कैफियत देण्याची संधी देखील आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी प्रतिवादी क्र.२ भुऱ्या चंदर कातकरी, प्रतिवादी क्र.३ लक्ष्मी बाबू वाघमारे, प्रतिवादी क्र.४ बारकी सिताराम कातकरी, प्रतिवादी क्र.५ मंगल सिताराम कातकरी, प्रतिवादी क्र६ कुसूम सिताराम कातकरी, प्रतिवादी क्र.७ संतोष सिताराम कातकरी उर्फ जाधव यांना दाव्यामध्ये प्रतिवादी नंबर २ ते ७ म्हणून प्रतिवादीपणात सामिल करुन घ्यावे व कायद्याने विहित करुन दिलेल्या वेळेत वरील प्रमाणे दुरुस्ती करावी तसेच दुरूस्त प्रत पटलावर दाखल करावी.

३. वादी यांना असेही आदेशीत करण्यात येते की, दुरूस्ती केल्यानंतर त्यांनी दुरूस्त दाव्याची प्रत प्रतीवादीना द्यावी.

४. खर्चाबाबत आदेश नाही.

Digitally signed by DIPALI SUBHASH KHOT
Date: 2026.02.02 17:09:04 +0530

**(डी. एस. खोत )**
सह दिवाणी न्यायाधीश
क. स्तर, खालापूर.

स्थळ – खालापूर.
दिनांक – ०२/०२/२०२६.